DATE: - 09/09/2015

# SAKAL (MARATHI)

## (PIMPRI CHINCHWAD) PAGE NO.05

### पालक मेळावा उत्साहात

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या वतीने आयोजित केलेल्या विद्यार्थी स्वागत व पालक मेळाव्यात दिव्या कुलकर्णी हिला 'उत्कृष्ट विद्यार्थिनी-१५' या पुरस्काराने सन्मानित केले. तिला सुवर्णपदक, रोख रक्कम १० हजार, मानपत्र प्रदान करण्यात आले. तर मृणाल सावळे हिला द्वितीय क्रमांकाचे रोख सात हजार, प्रमाणपत्र आणि दीप्ती महतो हिला तृतीय क्रमांकाचे रोख रक्कम पाच हजार, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश छाब्रिया, थिसेनक्रुप कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शिवसुब्रमण्यम नटराजन, रितू प्रकाश छाब्रिया, संचालक पी. व्ही. सी. पाटील, भरत चव्हाण पाटील, प्रा. डी. आर. करनुरे, संचालक डॉ. जे. जी. पाटील उपस्थित होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे विद्यार्थी रवी गुजर (उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक), लायब्ररीचा जास्तीत जास्त वापर करणारे अमृता गाठी, रवी गुजर, कुणाल पटेल, सूरज पुजारी, उज्ज्वला हमाम तर उत्कृष्ट प्रकल्पासाठी दीप्ती महतो, सुनील मोरे, मृणाल सावळे, पूजा चिंचे यांचा सन्मान करण्यात आला.